**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 मधील कलम-88 नुसार "महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी" तयार करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**दिव्यांग सक्षमीकरण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- दिव्यांग-2025/प्र.क्र.40 EOffice-851901/दि.क. 8**

31,32,35 ए, ए-विंग, मित्तल टॉवर,बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग,

नरिमन पॉईंट,मुंबई - 400 021.

**दिनांक:- 27 मार्च, 2026**

**संदर्भ:-**
1. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016
2. महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024
3. मा. मंत्रिमंडळ बैठक दिनांक 17 मार्च, 2026 चे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 या अधिनियमाने दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण, समानता व समावेशकतेच्या तत्त्वांचा संपूर्ण स्वीकार करुन केवळ सुविधा पुरविण्यावर मर्यादित न राहता "हक्कआधारित" दृष्टिकोन अंगिकारला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 नुसार सर्वसमावेशक, सक्षम व हक्क आधारित समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करणे अपेक्षित आहे. हा अधिनियम दिव्यांग व्यक्तींना जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पूर्ण सहभाग, सक्षमीकरण व संरक्षणाचा अधिकार प्रदान करतो.

दिव्यांग व्यक्तींच्या विकासासाठी समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनाबरोबरच विविध कायदे, संस्था, संघटना आणि योजनांद्वारे दिव्यांग व्यक्तींना सक्षम करणे, त्यांना समान संधी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि समाजाचे स्वतंत्र आणि उत्पादक सदस्य म्हणून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणारे सक्षम वातावरण निर्माण करणे तसेच सामान्य व्यक्तींप्रमाणे सुसह्य जीवन जगण्यासाठी योग्य अशा संधी उपलब्ध करुन देणे हे दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मुख्य ध्येय आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 मधील कलम-88 नुसार दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य दिव्यांग निधीची स्थापना करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. उपरोक्त कलम-88 नुसार दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य दिव्यांग निधीची स्थापना, व्यवस्थापन, निधीचा वापर, निधीच्या विनियोगाची कार्यपध्दती, अर्थसंकल्प, वार्षिक अहवाल याबाबतच्या तरतूदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 मधील कलम-88 नुसार **"महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी"** स्थापन करण्यास शासन मंजूरी देत आहे.

**1**. महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीचे स्वरूप, उद्दिष्टे व कार्यपद्धती खालीलप्रमाणे असेल -

**a) महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीचे स्वरुप :-**

a. दिव्यांग व्यक्तींसाठी **"महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधी"** ची स्थापना करण्यात येत आहे.

b. महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीमध्ये जमा केल्या जाणाऱ्या बाबी त्याचा भाग बनतील.

i. राज्य शासनाकडून प्राप्त झालेली रक्कम रूपये **20.00** कोटी;

ii. प्राप्त अनुदान, भेटवस्तू, व्यावसायिक सामाजिक दायित्त्व (CSR) अंतर्गत प्राप्त निधी, देणग्या, लाभ, मृत्यूपत्र किंवा हस्तांतरणाद्वारे प्राप्त झालेल्या सर्व रकमा;

iii. राज्य शासन ठरवेल, अशा इतर स्त्रोतांकडून प्राप्त झालेल्या सर्व रकमा;

iv. अन्य इतर स्त्रोतांकडून प्राप्त निधी.

c. महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीचे व्यवस्थापन करण्यासाठी खालील सदस्यांचा समावेश असलेल्या नियामक मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| I | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव-<br>दिव्यांग सक्षमीकरण विभाग | अध्यक्ष |
| II | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव - वित्त विभाग | सदस्य |
| III | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव - नियोजन विभाग | सदस्य |
| IV | सहसचिव / उप सचिव - दिव्यांग सक्षमीकरण विभाग | सदस्य |
| V | आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य-सचिव |

d. नियामक मंडळ आवश्यकतेनुसार परंतु प्रत्येक आर्थिक वर्षात किमान **1** वेळा बैठक घेईल.

e. सदस्य-सचिव, राज्य निधीशी संबंधित सर्व व्यवहार पार पाडतील.

**b) महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीचा वापर :-**

a. महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीचा विनियोग हा खाली दिलेल्या उद्दिष्टांकरीता केला जाईल:-

i. दिव्यांग व्यक्तींचे कल्याण, पुनर्वसन व सक्षमीकरणासाठी कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे व त्यासाठी केंद्रशासन, राज्यशासन, वित्तीय महामंडळे अथवा स्थानिक संस्थांद्वारे कार्यान्वित कोणत्याही योजनांमध्ये विविक्षितरित्या समाविष्ट नसलेल्या, पुरेसा निधी उपलब्ध नसलेल्या कार्यक्रमांना वित्तिय सहाय्य;

ii. अधिनियम व या नियमांत अंतर्भूत असलेली दिव्यांग व्यक्तींची समग्र वृध्दी, पुर्नवसन, सक्षमीकरण आणि कल्याणासाठी करावयाच्या इतर कार्यक्रमांकरीता किंवा उपक्रमांकरीता सहाय्य;

iii. उपरोक्त उद्देशांसाठी आणि अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीच्या उद्देशाने अनुषंगिक आणि अनुकूल असलेल्या इतर सर्व बाबी;

iv. नियामक मंडळाने ठरविलेले इतर कोणतेही उद्देश;

v. या अधिनियमांतर्गत होणारा राज्य दिव्यांग निधीसाठी प्रशासकीय अथवा इतर खर्च देणे.

b. खर्चाचा प्रत्येक प्रस्ताव नियामक मंडळापुढे मान्यतेसाठी सादर केला जाईल.

c. नियामक मंडळास योग्य वाटल्यास राज्य दिव्यांग निधीचे व्यवस्थापन व विनियोगाकरीता आवश्यकतेनुसार कर्मचारी वर्ग नियुक्त करू शकेल.

d. राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्यानुसार राज्य दिव्यांग निधीतून गुंतवणुक केली जाईल.

**c) <u>महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीच्या विनियोगाची कार्यपध्दती :-</u>**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीचा विनियोग खालीलप्रमाणे केला जाईल:-

i. राज्य दिव्यांग निधी नियामक मंडळाकडून मंजूर केला जाईल.

ii. महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024 मधील प्रकरण 6 नियम क्रमांक 11 मध्ये नमूद जिल्हास्तरीय समिती, त्यांच्या जिल्ह्याचे प्राप्त झालेले प्रस्ताव, मागणीचे स्वरुप विचारात घेऊन आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण यांचेकडे सादर करतील.

iii. आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन योग्य प्रस्ताव तीस दिवसांच्या आत अभिप्राय व शिफारशींसह दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांचेकडे सादर करतील.

iv. दिव्यांग सक्षमीकरण विभाग प्राप्त प्रस्ताव (आवश्यक असल्यास संबंधित विभागाशी विचार विनिमय करुन) दिव्यांग व्यक्तींसाठीच्या राज्य निधीच्या नियामक मंडळाकडे, अभिप्राय आणि शिफारशींसह सादर करेल.

v. नियामक मंडळ प्राप्त प्रस्तावांवर गुणवत्तेनुसार निर्णय घेईल. नियामक मंडळ सदर प्रस्ताव सकारण नाकारू शकेल. परंतु, सदरच्या निधीच्या वितरणाची पद्धत ही शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या मानकांप्रमाणे असेल.

**d) महाराष्ट्र <u>राज्य दिव्यांग निधी :-</u>**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीतील राज्य शासनाचे भागभांडवल **20.00** कोटी रूपये राहील.

**e) पात्रता व आवश्यक कागदपत्रे:-**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग निधीबाबत लाभार्थी (वैयक्तिक तसेच नोंदणीकृत संस्था इ.) यांची पात्रता ठरविणे व इतर अनुषंगिक आवश्यक बाबी ठरविण्याबाबतचा निर्णय नियामक मंडळाच्या बैठकीत घेण्यात येईल.

दिव्यांग राज्य निधीच्या खर्चाबाबतच्या मार्गदर्शक सूचना नियामक मंडळाच्या मान्यतेने स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात येतील.

**f) अर्थसंकल्प व वार्षिक अहवाल:-**

राज्य दिव्यांग निधीचे सदस्य-सचिव प्रत्येक आर्थिक वर्षासाठी प्रत्येक जानेवारी महिन्यात राज्य निधीचा अंदाजित जमा व खर्चाचा उल्लेख असलेली अर्थसंकल्पीय तरतूद तयार करून ती नियामक मंडळाच्या विचारार्थ सादर करतील. तसेच राज्य निधीचा वार्षिक अहवाल तयार करून सदरचा अहवाल राज्य नियमांमधील नियम- 15 नुसारच्या वार्षिक अहवालामध्ये समावेश करतील.

**g) लेखापरिक्षण:-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 मधील कलम-88 (4) नुसार राज्य दिव्यांग निधी खात्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडून लेखापरीक्षण केले जाईल.

**2.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ 265- 2026 / व्यय-14 अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**3.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०३२७१११११५९६५३५ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2026.03.27 11:13:44 +05'30'

**( तुकाराम मुंढे )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

1) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
2) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
3) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
4) मा. मंत्री, दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
5) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.

6) मा. विधानसभा/विधान परिषद सर्व सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
7) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
8) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
9) आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, पुणे.
10) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
11) सर्व आयुक्त, महानगरपालिका.
12) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
13) सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
14) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं. 1, योगक्षेम समोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई - 400 021.
15) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - 400 025.
16) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-400 021
17) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई- 400 028.
18) बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई- 013
19) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई- 400 013.
20) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - 400 013.
21) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - 400 028.
22) निवड नस्ती/ वित्त, लेखा व लेखापरिक्षण कार्यासन-8, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, मुंबई.